नि.दि.दा.क्र. ६९/२०१५
शोभाताई वि. ग्रा.पं.भारसिंगी

**आदेश निशानी क्रमांक १५ खाली**
(आज दि. ०२ जानेवारी, २०१७ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश २६, नियम ९ अंतर्गत दाखल करण्यात आला असून वादी याचे असे कथन आहे की, प्रतिवादीने दावा परिच्छेद २ब मधील मालमत्ता ही नाकारलेली आहे व दाव्यात नमूद केल्याप्रमाणे 'ब' ही मालमत्ता वादीच्या घराच्या नेमकी कुठे आहे. त्याचप्रमाणे 'ब' या मालमत्तेची सध्याची स्थिती कशी आहे. तसेच प्रतिवादी सिमेंट रोडचे बांधकाम कोणत्या जागेवर करीत आहे व ईतर बाबीचे अवलोकन करण्याकरीता न्यायालयीन कोर्ट कमिशनरची नियुक्ति करण्यात यावी.

२. प्रतिवादी यांनी सदरील अर्जावर आक्षेप नोंदविला व असे कथन केले की, वादीने सदरील मालमत्ता अस्तित्वात असल्याबाबत कुठलाही पुरावा सादर केला नाही. तसेच सदरील मालमत्ता ही या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर असल्यामुळे या प्रकरणात आयुक्ताची नेमणूक करता येणार नाही.

३. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणातील '२ब' मालमत्ता बघीतली असेता ती मौजे पारडसिंगा, प.ह.नं.४१, मौजे क्र. १८५, ता. काटोल, जि. नागपूर, अशी असल्याचे दिसून येते. मौजे मारडसिंगा हे या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर असल्यामुळे सदरील जागेच्या पाहणीकरीता न्यायालयीन आयुक्ताचा आदेश करता येणार नाही. तसेच वादीने ज्या

बाबीसाठी न्यायालयीन आयुक्ताची मागणी केली आहे, त्या बाबी पुरावा गोळा करणे कामी असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरील अर्ज मंजूर करता येणार नाही. म्हणून मी सदरील अर्ज खारीज करीत आहे.

(न. श्री. पुरी)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर
व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नरखेड

नरखेड
दिनांक: ०२.०१.२०१७